MHRG190000752023

:: विशेष दिवाणी दावा क्र.३९/२०२३ मधील निशाणी क्र.१५० खालील आदेश ::

प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २३, नियम १ प्रमाणे दाव्यातील परि.क्र.१४ मधील क्र.अ१, ब आणि ब१ कडील मागण्या सोडण्याची परवानगी मिळणेबाबत तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यातील परि.क्र.१४ मधील क्र.अ१, ब आणि ब१ कडील मागण्या वादीने सोडुन दिल्याबाबतची नोंद मुळ दाव्यावर करुन तशी दुरुस्ती अर्जात करण्याची परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

०२. अर्ज व प्रतिवादींनी अर्जास दिलेले म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०३. वादीतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा ठराव करुन मिळणेकरिता, सरस निरस वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. दावा प्रलंबन कालावधीमध्ये वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन दावा मिळकत अ मधील मिळकत क्र.१ चे बाबतील कै.चंद्रीबाई चंदु गोगावले व प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात करुन दिलेले दिनांक ०५.०१.२००९ रोजी निष्पादित व नोंदणीकृत झालेले खरेदीखत

क्र.३८/२००९ आणि दावा मिळकत अ मधील मिळकत क्र.२ च्या एकुण ५६–६८–०० हे.आर. या एकुण क्षेत्रापैकी ३२–६८–०० हे.आर. या क्षेत्राबाबत कै.चंद्रीबाई चंदु गोगावले व प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ चे लाभात करुन दिलेले दिनांक २९.१२.२००८ रोजी निष्पादित व दिनांक ३०.१२.२००८ रोजी नोंदणीकृत झालेले खरेदीखत क्र.३८११/२००८ व ही दोन खरेदीखते रद्दबातल ठरवुन मागितलेली आहेत. प्रतिवादी क्र.२ विरुध्द दाव्याचे काम एकतर्फा चाललेले असुन दावा अंतिम युक्तीवादाकरिता प्रलंबित आहे. दाव्याचे अंतिम युक्तीवादादरम्यान दावा मिळकत अ मधील मिळकत क्र.१ व २ या मिळकतीच्या सातबाराचे अवलोकन केले असता सदर मिळकती महाराष्ट्र शासन वन विभाग यांच्यातर्फे संपादित करण्यात आल्याचे निदर्शनास आले व तशी नोंद महसुल पत्रकी झालेली आहे.

०४. वादीतर्फे विधिज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वादीने दावा आहे तसा पुढे चालविल्यास दाव्यात तांत्रीक दोष राहणार आहे व मिळकतीचे अनुषंगाने इतर कोणत्याही मागण्या मागितल्यास दाव्या कामी गुंतागुंत होवुन दाव्याचे कामकाज लांबणार आहे. दावा मिळकतीचे त्रयस्थ इसमांस हस्तांतरण झाल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सदर मिळकती महाराष्ट्र शासन वन विभाग यांनी संपादित केल्याने वादी यांना त्या संदर्भात प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द वाटपाची दाद मिळण्याची परिस्थिती नाही. वादी यांना प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द प्रस्तुत दावा चालविण्याचा नाही तसेच दावा मिळकत अ मधील मिळकत क्र.१ व २ या क्षेत्राच्या वाटपाचीदेखील मागणी नाही परंतु भविष्यात वादीस सदर मिळकतीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.२ विरुध्द स्वतंत्र दावा दाखल करावयाचा झाल्यास तशी परवानगी मिळण्याचीदेखील

विनंती केली आहे. सबब वादीने दाव्यातील परि.क्र.१४ मधील क्र.अ१, ब आणि ब१ कडील मागण्या सोडण्याची परवानगी मिळणेबाबत तसेच सदरच्या मागण्या वादीने सोडुन दिल्याबाबतची नोंद मुळ दाव्यावर करुन तशी दुरुस्ती अर्जात करण्याची परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

०५. प्रतिवादीतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादी यांस सर्वे नं.२३, हिस्सा नं.४ब व सर्वे नं.७१ या मिळकतीबाबत महाराष्ट्र शासन वने याबाबतचा शेरा असल्याचे माहिती होते. वादीची सदरची मागणी प्रामाणिक व शुध्द हेतुन केलेली नाही. दाव्यातील मागण्या सोडताना वादीचा हेतु योग्य व बरोबर नाही. सबब, प्रतिवादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०६. केस फाईलची पडताळणी केली. प्रस्तुतचा दावा सरस निरस वाटप व तुटक वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या दावा अंतिम युक्तीवादासाठी नेमलेला असताना वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे दिसुन येते. वादीने मागणी केल्याप्रमाणे दाव्यातील परि.क्र.१४ मधील क्र.अ१, ब आणि ब१ कडील मागण्या सोडण्याची तसेच सदरच्या मागण्या वादीने सोडुन दिल्याबाबतची नोंद मुळ दाव्यावर करण्याची विनंती केली आहे.अर्जाचे व दाव्याचे एकुणच स्वरुप पाहता, प्रस्तावित दुरुस्ती रास्त आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नसल्याचे प्रकर्षाने दिसुन येते. प्रस्तुतचा अर्ज हा प्रामाणिक दिसुन येतो. सदर कारणमीमांसा लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो. परिणामी खालील आदेश.

दिनांक १५.०९.२०२५

**:: आदेश ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मागणी केल्याप्रमाणे मौजे कामथे, ता.पोलादपुर, जि.रायगड येथील सर्वे नं.२३, हिस्सा नं.४, क्षेत्र ५–४३–०० हे.आर. व सर्वे नं.७१, एकुण क्षेत्र ५–६८–०० पैकी प्रतिवादी क्र.२ यांनी खरेदी केलेले ३२–६८–०० या मिळकतीच्या बाबतीत दाव्यातील परिच्छेद क्र.१४ मधील क्र.अ१, ब आणि ब१ या मागण्या वादीस सोडुन देण्याची परवानगी देण्यात येते.

२. वादीस प्रतिवादी क्र.२ विरुध्द मिळकत क्र.१ व २ संदर्भात आवश्यकता भासल्यास दावा दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादीने विहीत मुदतीत दाव्यात दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करण्याबाबत आदेशित करण्यात येते.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.15 16:57:20 +0530

महाड
दिनांकः१५.०९.२०२५

**(श्रीमती एच.आर.जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
महाड.